

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटुसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक १०३ वा | शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे आजपासून 'काटा बंद' आंदोलन

२४ नोव्हेंबरला भिमानगर येथे पुणे-सोलापूर महामार्ग रोखणार

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- ऊस दराच्या प्रश्नावर साखर कारखानदारांनी घेतलेल्या दुटप्पी भूमिकेच्या निषेधार्थ सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे आजपासून 'काटा बंद' आंदोलन सुरू करण्यात आले आहे. तसेच, येत्या २४ नोव्हेंबर रोजी भिमानगर (टेंभुर्णी) येथे पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग बेमुदत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आंदोलनात शेतकऱ्यांनी लाखोच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी शासकीय विश्रामग्रह पंढरपूर येथे झालेल्या शेतकऱ्यांच्या बैठकीत केले आहे.

ऊस दराचा तिढा सोडवण्यासाठी साखर कारखानदार व शेतकरी संघटना यांची संयुक्त बैठक (दि. १९) सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात आली होती. मात्र, राजू शेट्टी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे कठीण जाईल आणि त्यांची मागणी रास्त असल्याने त्यांच्यासमोर बोलता येणार नाही, या भीतीने कारखानदारांनी एक दिवस आधीच बैठक उरकून घेतली. कोणताही ठोस तोडगा न काढता शेतकऱ्यांचे आंदोलन





कारखान्यांना शेतकऱ्यांना ३५०० रुपये पहिली उचल देणे सहज शक्य आहे.

मोडीत काढण्याचा प्रयत्न कारखानदारांकडून केला जात असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.

राजू शेट्टी यांनी आजच्या शासकीय विश्रामग्रह येथे झालेल्या बैठकीत कारखान्यांच्या उत्पन्नाचा पोलखोल केली. सोलापूर जिल्ह्यात एकूण ३९ साखर कारखाने आहेत. यापैकी १४ हून अधिक कारखान्यांची साखर रिकव्हरी ११ टक्क्यांपेक्षा जास्त आहे, तर ११ कारखान्यांची रिकव्हरी ९.७५ ते १०.७५ टक्के इतकी आहे. या आकडेवारीनुसार सर्व

तरीही, सर्वपक्षीय साखर कारखानदारांनी आपापसातील गट-तट विसरून एकत्र येत शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न चालवला आहे. कारखानदारांच्या या भूमिकेचा निषेध म्हणून आजपासून जिल्ह्यातील कारखान्यांचे काटे बंद ठेवण्यात येणार असून, २४ नोव्हेंबरच्या महामार्ग रोको आंदोलनात जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राजू शेट्टी आणि महादेव जानकर यांनी केले आहे.

भाजपने मतदार कसे वगळले? रोहित पवारांचा ऑडियो बॉम्ब

मुंबई (कटूसत्य वृत्त):- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा राज्य सरकारवर मतचोरीचा आरोप करत जोरदार निशाणा साधला आहे. रोहित पवार यांनी यासंबंधीची एक कथित ऑडियो क्लीप व्हायरल केली आहे, यामध्ये त्यांनी निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने नावे वगळली, असा गंभीर आरोप केला आहे.

नेमकी काय आहे ही ऑडियो क्लीप? जाणून घ्या... ऑडियो क्लीपमध्ये नेमकं काय?

याबाबत सविस्तर माहिती अशी की, भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या मतदारांची नावे खोटे अर्ज करुन कमी करुन घेतल्याचा धक्कादायक दावा या ऑडियो क्लीपमध्ये करण्यात आला आहे.



यासंबंधीत तहसिलदारांकडे आलेल्या तक्रारीनुसार बोगस अर्जदारांनी किंवा भाजपच्या कार्यकर्त्यांनी विरोधकांच्या मतदारांचे नाव कमी करण्यासाठी अर्ज केले आहेत. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी आमची मागणी असल्याचे वकील राहुल मखरे सांगत आहेत. याचसंदर्भात त्यांचे एका भाजप कार्यकर्त्याशी बोलणे झाल्याचं या ऑडियो क्लीपमध्ये दिसत आहे.

या कथित ऑडियो क्लीपमध्ये वकील राहुल मखरे नावाची व्यक्ती बोलत आहे. ही व्यक्ती कोकाटे या दुसऱ्या व्यक्तीला तुम्ही मतदार यादीतून नावे वगळण्यासाठी अर्ज केला होता का? अशी विचारणा करत आहे. मात्र मी फक्त मृत व्यक्तींची नावे कमी करण्यासाठी अर्ज केला होता. ही नावे कोणी दिली याबाबत माहितीच नसल्याचे सांगत आहे.

तसेच मी कामात होतो त्यावेळी भाजपचे कार्यकर्ते आले त्यांनी मला फक्त सही करायला सांगितले. ही कागदे भाजप कार्यालयातून आली होती. मी फक्त सही केली होती, मात्र पुढे काय झाले? याबाबत मला माहिती नाही असं हा भाजप कार्यकर्ता सांगत आहे. वकील राहुल मखरे यांनी गुन्हा नोंद करणार असल्याचे सांगत असताना तुम्हाला करायचे असेल तर आमच्यावर गुन्हा दाखल करा? असं म्हणत आहे.

रोहित पवार यांचा भाजपवर निशाणा!

दरम्यान, या ऑडियो क्लीपवरुन रोहित पवार यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे. निवडणूक जिंकण्यासाठी विरोधी विचारांच्या खऱ्या मतदारांची मतदार यादीतून नावं भाजपाने कशी वगळली आणि रडीचा डाव खेळून सत्ता कशी मिळवली त्याचा घ्या हा पुरावा, या ऑडिओतून शंभर टक्के खात्री झाली की या सरकारला मतदारांनी निवडून दिल नाही तर यांनी मतांची चोरी करुन सत्तेचा इमला बांधला. त्यामुळं एक क्षणही या सरकारला सत्तेत राहण्याचा नैतिक अधिकार नाही, असं रोहित पवार यांनी म्हटलं आहे.

मोहोळचे सुपुत्र डॉ. कौशिक गायकवाड यांना जनसंवाद व पत्रकारितेत पीएच.डी. प्रदान !

सनराईज विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात ८३० स्नातकांना पदवी वितरण

विविध २१ शैक्षणिक पात्रता व पदव्यांनी समृद्ध असलेला बहुआयामी शैक्षणिक प्रवास

मोहोळ (कटूसत्य वृत्त) : सोलापूर जिल्ह्यातील मोहोळचे सुपुत्र डॉ. कौशिक गायकवाड यांनी शैक्षणिक क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण यश संपादन केले असून, राजस्थानमधील सनराईज विद्यापीठातून 'मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम' (Mass Communication and Journalism) या विषयात पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. विविध ज्ञानशाखांमधील उच्च शिक्षण, संशोधन आणि व्यावसायिक पात्रता असा प्रदीर्घ शैक्षणिक प्रवास करणाऱ्या डॉ. गायकवाड यांच्या शिरपेचात या नव्या पदवीमुळे आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सनराईज विद्यापीठाच्या वतीने आयोजित भव्य पदवीदान तथा दीक्षान्त समारंभ उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. या समारंभात विद्यापीठातील एकूण ८३० स्नातकांना विविध विद्याशाखांमधील पदव्या प्रदान करण्यात आल्या. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून पोलीस महासंचालक उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जितेंद्र यादव, उपकुलगुरू डॉ. कृष्ण नाथ पांडे, रजिस्ट्रार डॉ. पंकज गुप्ता, विद्यापीठ ट्रस्टचे चेअरमन तसेच अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात आला.





पत्रकारिता व जनसंवाद क्षेत्रातील संशोधनाला विशेष महत्त्व

पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. समाजातील प्रश्नांना वाचा फोडणे, सामान्य नागरिकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे, शासन आणि प्रशासनाच्या कामकाजावर लोकशाहीच्या चौकटीत लक्ष ठेवणे, जनमत घडवणे आणि सामाजिक परिवर्तनाला दिशा देणे, यामध्ये पत्रकारिता व जनसंवादाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

अशा महत्त्वपूर्ण विषयात संशोधन करून पीएच.डी. पदवी प्राप्त करणे ही डॉ. कौशिक गायकवाड यांच्या शैक्षणिक वाटचालीतील महत्त्वाची उपलब्धी ठरली आहे. विविध विषयांतील अध्ययन आणि संशोधनाचा अनुभव पत्रकारिता व जनसंवाद क्षेत्राच्या अभ्यासाला व्यापक दृष्टिकोन देणारा ठरू शकतो.

मोहोळच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब

मोहोळसारख्या तालुक्याच्या ठिकाणाहून विविध ज्ञानशाखांमध्ये उच्च शैक्षणिक पात्रता संपादन करत पीएच.डी.पर्यंत मजल मारणे ही निश्चितच उल्लेखनीय बाब आहे. डॉ. कौशिक गायकवाड यांच्या या यशामुळे मोहोळच्या नावलौकिकात भर पडली असून, त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची परिसरात चर्चा होत आहे.

शिक्षणाला वयाची किंवा विषयाची मयार्दा नसते, तर जिद्द, चिकाटी आणि ज्ञानाची आवड असेल तर विविध क्षेत्रांत प्रगती साधता येते, याचे उदाहरण त्यांच्या बहुआयामी शैक्षणिक वाटचालीतून समोर येते.

डॉ. कौशिक गायकवाड यांच्या या नव्या यशाबद्दल मोहोळ शहरासह सोलापूर जिल्ह्यातील मित्रपरिवार, नातेवाईक, पत्रकार बांधव, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या पुढील संशोधनात्मक, शैक्षणिक आणि सामाजिक वाटचालीस सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

२१ शैक्षणिक पात्रता व पदव्यांचा अनोखा प्रवास

डॉ. कौशिक गायकवाड यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केवळ एका विषयापुरते स्वतःचे शैक्षणिक क्षेत्र मर्यादित न ठेवता औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, सहकार, बँकिंग, पत्रकारिता, जनसंवाद, राज्यशास्त्र, विधी, निसर्गोपचार, योगशास्त्र आणि मानसशास्त्र अशा विविध ज्ञानशाखांमध्ये शैक्षणिक पात्रता संपादन केली आहे. त्यांच्या शैक्षणिक प्रवासात बी. फार्मसी, एम.बी.ए. (सहकार व्यवस्थापन), व्यवस्थापनशास्त्रातील पीएच.डी., सहकारी बँकिंग व व्यवस्थापन विषयातील पीएच.डी., कर सल्लागार विषयातील व्यावसायिक प्रमाणपत्र (पी.टी.सी.), पत्रकारिता व जनसंवादातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि पदविका, निसर्गोपचार विषयातील पदविका, पर्यायी वैद्यकीय पद्धतीतील पदवी, निसर्गोपचार व योगशास्त्र विषयातील पदविका, तसेच कम्युनिटी मेडिकल सर्व्हिसेस अँड इसेन्शियल ड्रग्स (CMS & ED) प्रमाणपत्र यांचा समावेश आहे.

याशिवाय कॉमनवेल्थ मानद पीएच.डी., राज्यशास्त्र विषयातील एम.ए., पत्रकारिता व जनसंवाद विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.जे.एम.सी.), मानद पीएच.डी., विधी शाखेतील एल.एल.बी. व एल.एल.एम., क्लिनिकल सायकॉलॉजी विषयातील पदव्युत्तर पदविका, समुपदेशन व मार्गदर्शन विषयातील पदव्युत्तर पदविका, एम.बी.ए. (वित्त व्यवस्थापन) आणि जनसंवाद विषयातील पीएच.डी. अशा एकूण २१ शैक्षणिक पात्रता व पदव्यांचा त्यांच्या शैक्षणिक प्रवासात समावेश आहे.

विविध क्षेत्रांतील ज्ञान संपादन करण्याची जिज्ञासा, सातत्याने अभ्यास करण्याची वृत्ती आणि नवनवीन विषयांमध्ये प्रावीण्य मिळवण्याची धडपड त्यांच्या शैक्षणिक वाटचालीतून दिसून येते. विशेष म्हणजे व्यवस्थापन, सहकार, विधी, पत्रकारिता आणि जनसंवाद अशा परस्परांशी संबंधित तसेच स्वतंत्र क्षेत्रांमध्ये त्यांनी शिक्षण घेतले आहे.

कार्तिकी यात्रा कालावधीत एकाही वारकऱ्याची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी वारीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. सर्वसामान्य वारकरी भाविक हा आपला खरा व्हीआयपी आहे. त्यामुळे त्याचे समाधान झाले पाहिजे. सर्व सुविधांसह दर्शन वेळेत झाले पाहिजे. त्यामुळे प्रशासनाने यात्रा कालावधीत एकाही वारकऱ्याची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी व आवश्यक त्या सर्व सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध कराव्यात. त्यासाठी आवश्यक असलेला निधी नगर विकास विभागाच्या माध्यमातून तात्काळ उपलब्ध करण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पंढरपूर शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात आयोजित कार्तिकी वारी 2026 च्या अनुषंगाने आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, उत्तम जानकर, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, राष्ट्रीय महामागार्चे प्रकल्प संचालक अभिजीत आवटी, नगराध्यक्ष प्रणिती भालके, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य



अधिकारी संतोष कोपुरवाड, महावितरण चे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, येथे येणाऱ्या वारकरी, भाविकांना समाधान मिळाले पाहिजे. ही वारी निर्मल व स्वच्छ असली पाहिजे. वारकरी हाच व्हीआयपी असल्याने आपण व्हीआयपी दर्शन बंद केलेले आहे. यात्रा कालावधीत वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे त्रास झाला नाही पाहिजे. पोलीस विभागानेही अत्यंत चोखपणे बंदोबस्त ठेवावा. वीज वितरण कंपनीने संपूर्ण यात्रा कालावधीत वीज पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी, त्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे, असे त्यांनी सूचित केले.

राष्ट्रीय महामार्गाचे अधिकाऱ्यांनी शहरातून जाणारा महामार्गाच्या रस्त्यावर धूळ राहणार नाही यासाठी तात्पुरते डांबरीकरण करून घ्यावे. महामागार्चे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे, कामाची गती वाढवून रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिले. येथे येणाऱ्यांना भाविकांना स्वच्छतेबरोबरच शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध झाले पाहिजे त्या दृष्टीने काळजी घ्यावी तसेच दहा लाख पाणी बॉटल उपलब्ध झालेल्या आहेत, त्याचे मोफत वितरण सुरू झालेले आहे. आवश्यकता पडल्यास अधिक पाणी बॉटल उपलब्ध करून घ्याव्यात, असेही त्यांनी सूचित केले.

पंढरपूर शहरात वारकऱ्यांसाठी सुविधा निर्माण करण्यासाठी पुढील विविध प्रकल्पासाठी नगर विकास विभागाकडून पाहिजे तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्या पद्धतीने प्रशासनाने कामे करून घ्यावी. 65 एकरचे प्लॉटचे काँक्रिटी करून करून घ्यावे त्या ठिकाणी वृक्ष लागवड ही करावी असे त्यांनी सांगितले.

तसेच संपूर्ण यात्रा कालावधीत सर्व शासकीय यंत्रणा अशाच पद्धतीने कार्यान्वित राहील व वारकऱ्यांना सेवा देईल याची दक्षता घ्यावी असेही शिंदे यांनी सुचित केले. पंढरपूर नगरपरिषदेसाठी स्वीपर मशीन तसेच जेटिंग मशीन उपलब्ध करून देण्यात आलेले आहे असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी जिल्हा प्रशासनाच्या वतीने पंढरपूर शहरात येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली. स्वच्छतेसाठी पंढरपूर नगरपालिकेचे 1200 कर्मचारी कार्यरत असून 1500 शौचालयाची सुविधा उपलब्ध केलेली आहे. नगरपालिकेने अतिक्रमण काढण्याची मोहीम हाती घेतलेले आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने 50 लाखाचे औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासन सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले. तर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पोलीस विभाग वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी सदैव कार्यरत असल्याचे सांगितले. गर्दीवर नियंत्रणासाठी वाहतुकीचे सुयोग्य नियोजन केल्याचे माहिती त्यांनी दिली तसेच संपूर्ण यात्रा कालावधीत पोलीस विभागाचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पंढरपूर दौऱ्यादरम्यान (१९ नोव्हेंबर २०२६) दुपारी त्यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याची घटना घडली. कार्तिक यात्रेच्या तयारीची पाहणी केल्यानंतर ते मुंबईला परतण्यासाठी हेलिपॅडवर पोहोचले होते; मात्र उड्डाणापूर्वीच हेलिकॉप्टर अचानक बंद पडल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सुदैवाने हेलिकॉप्टर जमिनीवर असतानाच हा बिघाड लक्षात आल्याने कोणतीही दुर्घटना घडली नाही.



एक इंजिन सुरू झाले, पण दुसरे इंजिन अडकले

एकनाथ शिंदे पंढरपुरातील कार्यक्रम आटोपून हेलिकॉप्टरमध्ये बसले होते. पायलटने उड्डाणासाठी हेलिकॉप्टर सुरू करण्याचा प्रयत्न केला असता पहिले इंजिन सुरू झाले, परंतु दुसरे इंजिन सुरूच होत नव्हते. हेलिकॉप्टरची बॅटरी लो (Battery Low) असल्याने आणि बॅटरीमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ही अडचण निर्माण झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. तांत्रिक पथकाने आणि पायलटने बॅटरी चार्ज करून हेलिकॉप्टर सुरू करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यात यश आले नाही.

अखेर कारने पुण्याकडे आणि तेथून विमानाने मुंबईला

ऐन परतीच्या वेळी हेलिकॉप्टर सुरू होत नसल्याचे पाहून स्थानिक प्रशासनाची मोठी तारांबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि सुरक्षा दलाचे वरिष्ठ अधिकारी तातडीने हेलिपॅडवर दाखल झाले. या तांत्रिक अडचणीमुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना हेलिपॅडवर सुमारे २० ते २५ मिनिटे थांबावे लागले.

अखेर सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या विनंतीनंतर त्यांनी हेलिकॉप्टर प्रवास रद्द केला. ते पंढरपूरहून कारने (रस्तेमार्गे) पुण्याच्या दिशेने रवाना झाले असून, पुण्याहून विमानाने मुंबईला जाणार आहेत.

संपादकीय

सत्य समोर यावेच !

दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या संबंधातील संभ्रम आज त्यांच्या मृत्यूनंतर सुमारे दहा महिन्यांनंतरही कायम आहे. हा विषय रोहित पवार यांनी अत्यंत आक्रमकपणे लावून धरला आहे. या अपघाताच्या संदभार्तील काही महत्त्वाचे मुद्दे त्यांनी यापूर्वीच मांडले असून, हा अपघात नसून घातपातच आहे असा निष्कर्ष त्यांनी त्या सुमारालाच काढला होता. पण मग जर तो घातपात असेल तर तो घडवला कोणी हा यातला मुख्य मुद्दा आहे.

त्यामुळे त्या अनुषंगाने रोहित पवार नव्याने काय माहिती सांगतात याविषयी सगळीकडे उत्सुकता होती. त्यानुसार रोहित पवार यांनी काल मुंबईत पत्रकार परिषद घेऊन थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दिशेनेच अंगुली निर्देश केला आहे. हा घातपात देवेंद्र फडणवीस यांनीच घडवला आहे असे आपले म्हणणे नाही, पण हा घातपात घडवर्णाया आरोपींना देवेंद्र फडणवीस वाचवत आहेत, असा त्यांचा थेट आरोप आहे.

रोहित पवार यांची पत्रकार परिषद होण्याच्या आधी मुंबईत आणि पुण्यात काही ठिकाणी एका मफलर मॅन विषयी संशय व्यक्त करणारी पोस्टर्स जारी करण्यात आली होती. हा मफलर मॅन कोण, याविषयीचा सस्पेन्स दोन दिवस जागवला गेला आणि सनसनाटी पद्धतीने रोहित पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांचा संशयित आरोपी असलेल्या व्यक्तींबरोबरचा मफलर मधला फोटो काल पत्रकारांपुढे सादर केला.

अजित पवार यांच्या ज्या विमानाला अपघात झाला ते विमान ज्या कंपनीच्या मालकीचे आहे त्या कंपनीच्या मालकावर रोहित पवार यांचा संशय आहे आणि त्या मालकाशी देवेंद्र फडणवीस यांचे व्यक्तिगत संबंध आहेत वगैरे आरोप त्यांनी कालच्या पत्रकार परिषदेत केले. निवडणुकीचा निकाल ज्या दिवशी जाहीर होणार होता नेमक्या त्याच दिवशी देवेंद्र फडणवीस या आरोपीशी संबंधित एका लग्न समारंभासाठी जयपूरला गेले होते तिथे त्यांच्याबरोबर घेतला गेलेला हा फोटो आहे.

त्यांचे म्हणणे असे की, राज्याच्या निवडणुकांची धुरा ज्या व्यक्तीच्या खांद्यावर होती ती व्यक्ती निवडणूक निकालाच्या दिवशीच असे बाहेरगावी कुठल्या एखाद्या लग्न समारंभाला जाण्याची शक्यता नाही, तरीही फडणवीस तिकडे गेले याचा अर्थ त्यांचा या संशयीतांशी खूप निकटचा संबंध आहे आणि तेच त्यांना वाचवत आहेत. त्यांच्या या आरोपामुळे पुरेशी सनसनाटी निर्माण झाल्यानंतर नेमक्या त्याच सुमाराला केंद्रीय गृहमंत्री अमित शहासुद्धा महाराष्ट्राच्या दौऱ्यावरच होते, नव्हे ते पुण्यातच होते. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याकडे अजित पवार यांच्या अपघात चौकशीचे काम त्वरित पूर्ण व्हावे अशी मागणी केली आहे.

यातील दोषींना फासावर लटकवण्याचे मनोगतसुद्धा त्यांनी व्यक्त केले आहे. याद्वारे फडणवीस यांनी आपल्यावरील संशयाचे मळभ दूर लोटण्याचा प्रयत्न केला आहे. हे जरी खरे असले तरी मूळ विषयावरून निर्माण झालेले संशयाचे धुके पूर्णपणे दूर झालेले नाही. एक तर या अपघाताच्या चौकशीला होत असलेला कमालीचा विलंब हे यातील एक मुख्य कारण असून दुसरे मुख्य कारण असे की या प्रकरणात अद्याप महाराष्ट्र पोलिसांनी एफआयआरसुद्धा दाखल केलेली नाही.

एखाद्या राज्याचा उपमुख्यमंत्री ज्या अपघातात दगावला आहे त्या अपघाताविषयी एफआयआर नोंदवण्यासाठी केली जाणारी ही टाळाटाळ संशयाचे धुके बळकट करणारीच ठरते, याचे भान राज्यातल्या आणि केंद्रातल्या विद्यमान सरकारांना यायला हवे होते, पण ते अजून काही आलेले दिसले नाही.

या प्रकरणात एफआयआर दाखल व्हावा यासाठी रोहित पवार यांनी खूप आटापिटा केला, पण त्यांना शेवटपर्यंत यश आले नाही. अखेर त्यांनी कर्नाटकात जाऊन तेथील काँग्रेस सरकारच्या मार्फत या प्रकरणी एफआयआर नोंदणी केली आहे, आता तो एफआयआर पुढील तपासासाठी महाराष्ट्र पोलिसांकडे वर्ग केला गेला असावा. एफआयआर नोंदवण्यासाठीची रोहित पवार यांची अनोखी शक्कल खूप काही सांगून जाणारी आहे आणि ती राज्यातील विद्यमान सरकारच्या विरोधातील संशयाचे वातावरण आणखीन गडद करणारी ठरली आहे.

हा सगळा तपशील ऐकल्यानंतर आणि वाचल्यानंतर लोकांच्या मनातही अनेक प्रकारच्या शंका उपस्थित होताना दिसत आहेत. काल रोहित पवार यांनी फडणवीस यांचे नाव घेऊन आरोप केल्यानंतर फडणवीस यांच्या समर्थकांनी रोहित पवार यांच्यावर जोरदार तोंडसुख घेतलेले दिसले, पण ही केवळ राजकीय स्वरूपाची चिखलफेक आहे त्यातून सत्य समोर येणार नाही किंवा लोकांच्या मनातील संभ्रमही दूर होणार नाही. त्यामुळे या सगळ्या प्रकाराची तंत्रशुद्ध पद्धतीने तातडीने शहानिशा होणे गरजेचे आहे.

एखाद्या गंभीर अपघातात एखाद्या राज्याचा उपमुख्यमंत्री दगावणे आणि त्या प्रकरणाची चौकशी महिनोन्महिने लांबवत ठेवणे हे कोणत्याच अथार्ने योग्य मानले जाऊ शकत नाही. त्यामुळे हा विषय आता ऐरणीवर आला असल्याने, तसेच संशयाची सुई थेट मुख्यमंत्री फडणवीस यांच्याच दिशेने गेली असल्याने तरी या प्रकरणाच्या चौकशीला वेग येईल अशी अपेक्षा आहे.

नुसत्या चौकशीला वेग येऊनही उपयोग नाही तर यातील नेमके सत्यही सगळ्यांच्या पुढे तातडीने येणे गरजेचे आहे. यासाठी केंद्र सरकारकडूनही तातडीने उपाय योजना केली जाईल अशी अपेक्षा आहे.

झाशीची राणी लक्ष्मीबाई; तळपत्या सुर्याचा तेजोमय प्रकाश

आज इतिहासातच नाही तर जगात झाशीची राणी लक्ष्मीबाईचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतल्या जाते. कारण कमी वयात देशासाठी लढा उभारून इंग्रजांशी दोन-दोन हात करून संघर्ष केला यात लक्ष्मीबाईची महानता अजरामर आहे.झाशीची राणी लक्ष्मीबाईचा जन्म मोरोपंत तांबे आणि भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी (वाराणसी) येथे १९नोव्हेंबर १८३५ ला झाला. लक्ष्मीबाईचे मुळ नाव मणिकर्णिका होते. लक्ष्मीबाईचे वडील मोरोपंत तांबे हे पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला होते.मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील गुहे गावचे होते.नंतर काशी येथे स्थायी झाले व तिथे लक्ष्मीबाईचा जन्म झाला. उत्तर भारतातील झाशी राज्यातील महाराज गंगाधरराव नेवलेकर यांच्याशी १९ में १८४२ ला विवाह झाला आणि लक्ष्मीबाई झाशीची राणी बनली.परंतु २१ नोव्हेंबर १८५३ रोजी महाराज गंगाधरराव नेवलेकर यांचे निधन झाले तेव्हा राणी अवघ्या १८ वर्षाच्या होत्या.तथापि राणीने आपला संयम आणि धैर्य राखले आणि बाळ दामोदरच्या लहान वयामुळे राणी लक्ष्मीबाईने राज्याचा ताबा घेतला. लक्ष्मीबाई एकोणिसाव्या शतकातील झाशी राज्याच्या महाराणी होत्या. १८५७ च्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरूध्द झालेल्या स्वातंत्र्य उठावातील एक अग्रगण्य तेजस्वी, महाप्रतापी आणि कमी वयातील बहादुर सेनानी होत्या.७ मार्च १८५४ रोजी ब्रिटिश सरकारने झाशीला ब्रिटिश साम्राज्यात सामील होण्याचे आदेश देणारे अधिकृत राजपत्र जारी केले. ब्रिटीश अधिकारी ॲलिसचा हा आदेश राणी लक्ष्मीबाईने ऐकल्यावर तळ पायाची आग मस्तकात गेली व आदेश पाळण्यास नकार दिला आणि "मी झाशी देणार नाही" असे जाहीर केले व झाशी हे बंडाचे केंद्र बनले.सर ह्यु रोज यांनी २२ मे १८५८ रोजी काल्पीवर हल्ला केला.परंतु राणी लक्ष्मीबाईने आपल्या पराक्रमाने ब्रिटिशांना पराभूत केले. यामुळे ब्रिटिश तिलमीला झाले व पुन्हा काल्पीवर हल्ला केला आणि राणीचा पराभव झाला. या पराभवानंतर रावसाहेब पेशवे, बांद्याचे नवाब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई आणि इतर महत्वाचे



सैनिक गोपाळपूरला जमले. यावेळी राणीने ग्वाल्हेर ताब्यात घेण्याचा सल्ला दिला. लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे यांनी बंडखोर सैन्यासह ग्वाल्हेरवर कूच केले व ग्वाल्हेरचा किल्ला काबीज केला आणि ग्वाल्हेरचे राज्य पेशव्यांच्या ताब्यात दिले.१८५७ चा उठाव हा संपूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याचप्रमाणे ५ जून १८५७ ला झाशीतही शिपायांचा उद्रेक झाला व केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून सोडले.२२ में १८५८च्या कल्पीच्या लढाईनंतर राणी ३०-३१ मे १८५८ रोजी ग्वाल्हेरला आल्या.तेथे स्वस्त न बसता लक्ष्मीबाईनी आपल्या सैन्याची कवायत नियमित सुरू ठेवली. इंग्रजांना रोखण्यासाठी कशा प्रकारे मोर्चे बांधणी करावी या विषयी त्यांनी चर्चा केली. अचानक याचवेळी १७ जून १८५८ रोजी ब्रिटिश अधिकारी स्मिथ सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ "कोटा की सराय" येथे येऊन पोहोचला व त्यांने त्वरित हल्ला चढवला. अशा परिस्थितीत लक्ष्मीबाईने रणांगणात धाव घेतली आणि लक्ष्मीबाईने ब्रिटिश शिपायांना तलवारीने सपासप कापत सामोरं जात होत्या.विजेसारख्या तळपणाऱ्या राणीकडे पाहून त्यांच्या सैनिकांमध्ये आणखी जोश आला व ब्रिटिश सैन्याला छाटुन काढले.अशा परिस्थितीत इंग्रज अधिकारी स्मिथचे सैन्य मागे हटणार होते.परंतु घात झाला आणि नव्या दमाची एक फौज बाजूच्या टेकडीवरून चालून आली.अशा परिस्थितीत आपला टिकाव लागणार नाही हे पाहुन स्वारांनिशी बाहेर पडल्या.थोडे पुढे जाताच एका ओढ्यापाशी त्यांचा "राजरत्न" नावाचा (हा नवीन घोडा होता) घोडा अडला. नेहमीचा "सारंगी" नावाचा घोडा शेवटच्या लढाईत त्यांच्याबरोबर नव्हता.अशा परिस्थितीत काही केल्या घोडा ओढा ओलांडत नव्हता. इंग्रजांशी लढत असतांना राणी लक्ष्मीबाई रक्तबंबाळ होऊन घोड्यावरून खाली कोसळल्या.परंतु पुरूषी वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखू शकले नाहीत व इंग्रज पुढे निघून गेले.घायाळ झालेल्या राणी लक्ष्मीबाई यांना सेवक रामचंद्र देशमुखांनी फुलबाग येथील बाबा गंगादास यांच्या मठात आणले.आपला देह इंग्रजांच्या हाती लागू नये अशी त्यांची इच्छा होती. फुलबाग येथे बाबा गंगादास यांच्या मठात तात्या टोपे, रामचंद्रराव देशमुख, काशीबाई कुनविन, गुलमोहम्मद, बांदा नवाब बहादुर अली आणि दामोदर राव यांनी मुखाग्नी दिली. अशा प्रकारे महान योध्द्या राणी लक्ष्मीबाई यांनी वीरमरण पत्करून वयाच्या तेविसाव्या वर्षी प्राणज्योत मालवली.राणी लक्ष्मीबाईचा स्वर्गवास १७ जून १८५८ ला झाला.परंतु इंग्रज सरकारने राणी लक्ष्मीबाईना १८ जूनला मृत घोषित केले.त्यामुळे १८ जुनला पुण्यतिथी साजरी केली जाते. त्यांची यशोगाथा भारतवर्ष कधीही विसरणार नाही.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश -पाताळ आहे तोपर्यंत झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे नाव अमर राहील. देशात झाशीची राणी लक्ष्मीबाई याची प्रेरणा निरंतर आपल्या हृदयात रहावी यासाठी त्यांच्या जयंतीनिमित्त देशात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व्हायला हवी.कारण आज बदलत्या हवामानामुळे मानवासह संपूर्ण जीवसृष्टी धोकादायक स्थितीत येऊन ठेपली आहे व भयभीत झाली आहे.यावर उपाय म्हणून झाशीची राणी यांच्या जयंतीनिमित्त मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली पाहिजे.असे जर झाले तर आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानांत,फुलात, फळात झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे दर्शन अवश्य होईल. राणी लक्ष्मीबाई यांना जयंतीनिमित्त माझा कोटी कोटी प्रणाम.जय हिंद !



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

कार्तिकी वारीत वारकऱ्यांना दर्जेदार आरोग्य सुविधा द्या - सभापती चेतनसिंह केदार सावंत

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- आगामी कार्तिकी एकादशी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेने सज्ज राहून वारकऱ्यांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वारी काळात आरोग्य सेवेत कोणत्याही प्रकारची कमतरता राहू नये, अशा स्पष्ट सूचना जिल्हा परिषद आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिल्या.



जिल्हा परिषद सोलापूर येथे सभापती चेतनसिंह केदारसावंत यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य व शिक्षण समितीची मासिक सभा पार पडली. या सभेत जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी सर्व आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सभेत राष्ट्रीय कुटुंब कल्याण, माता व बाल आरोग्य, कुष्ठरोग निर्मूलन, क्षयरोग नियंत्रण, हिवताप आणि हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. याशिवाय औषधसाठा, आरोग्य सुविधा ॲप, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, एनआरएचएम कर्मचाऱ्यांचे प्रश्न, जन आरोग्य समिती सदस्यांची निवड तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा करण्यात आली.

जन आरोग्य संवाद यात्रेदरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळनेर (ता. माढा) यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाची राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी प्रशंसा केली होती. या उल्लेखनीय कामाची दखल घेत आरोग्य व शिक्षण समितीच्या सभेत ठराव मंजूर करून सदस्यांनी टाळ्यांच्या गजरात पिंपळनेर आरोग्य केंद्राचे अभिनंदन केले. तसेच बार्शी तालुक्यात बोगस डॉक्टरांविरोधात राबविण्यात आलेल्या धडक मोहिमेचेही सदस्यांनी कौतुक केले.

गोरगरीब रुग्णांना उपचारासाठी खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागू नये, यासाठी शासकीय आरोग्य संस्थांनी दजेर्दार आरोग्य सेवा पुरविणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा आरोग्य संस्थेत औषधांचा तुटवडा जाणवता कामा नये. औषधांच्या उपलब्धतेबाबत सर्वांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश केदार सावंत यांनी दिले. तसेच लसीकरणाची प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रनिहाय आकडेवारी पुढील सभेत सादर करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

आरोग्यविषयक योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी नव्या ॲपद्वारे योजनांची माहिती संकलित करून अद्ययावत ठेवावी. सर्व तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करून जिल्ह्याच्या आरोग्य सेवेचा दर्जा उंचवावा. आरोग्यविषयक कार्यक्रमांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही सभापती केदार सावंत यांनी दिली.

या सभेस समिती सदस्य सोनाली परसम्मा कडते, संदीप अमृत टेळे, नागनाथ पांडुरंग भोसले, सविता संजय कोकाटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिवंत, प्रशासन अधिकारी डॉ. वरवटकर, मंजूळ, निटोरे, पीएचएन प्रतिनिधी, गोपाळ शिंदे यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

तहसीलदारच्या विरोधात सर्वपक्षीय पत्रकार परिषद



इंदापूर (कटूसत्य वृत्त):- इंदापूर तालुक्यातील महसूल प्रशासनाच्या कारभाराविरोधात आता विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटना एकत्र आल्या आहेत. तहसील कार्यालयातील कथित अनियमितता, नागरिकांना होणारी गैरसोय, महसुली कामकाजातील दिरंगाई आणि प्रलंबित कामांच्या प्रश्नावरून २५ नोव्हेंबर रोजी इंदापूर येथे भव्य सर्वपक्षीय मोचार्चे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाच्या माध्यमातून तहसीलदारांच्या कारभाराची सखोल चौकशी करण्यात यावी आणि त्यांचे तातडीने निलंबन करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात येणार आहे. याबाबतची माहिती इंदापूर येथील सोनाई पॅलेस येथे आयोजित पत्रकार परिषदेत विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

पक्षभेद बाजूला; जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य

इंदापूर तालुक्यातील नागरिकांच्या प्रश्नांसाठी राजकीय पक्षभेद बाजूला ठेवत भारतीय जनता पक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना (एकनाथ शिंदे गट), रयत क्रांती सेना, भटक्या विमुक्त जमाती संघटना, स्वाभिमानी लहुजी सेना तसेच भीमा कोरेगाव विजयस्तंभ सेवा संघ यांसह अनेक सामाजिक संघटना एकवटल्या आहेत. या सर्व संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते २५ नोव्हेंबरच्या मोर्चात सहभागी होणार असल्याचे पत्रकार परिषदेत स्पष्ट करण्यात आले.

हे आंदोलन कोणत्याही एका राजकीय पक्षापुरते मर्यादित नसून, ते सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि जनतेच्या न्याय्य हक्कांशी संबंधित असल्याचे स्पष्ट करण्यात आले. जनतेच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेण्यासाठी सर्व सज्जन शक्तींनी या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहनही पदाधिकाऱ्यांनी केले.

नागरिकांची कामे प्रलंबित; तक्रारींना वाव

पत्रकार परिषदेत बोलताना विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी इंदापूर तहसील कार्यालयाच्या कामकाजाबाबत गंभीर आक्षेप नोंदवले. सातबारा उतारे, फेरफार नोंदी, वारस नोंदी, जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, रेशनकार्ड यांसारख्या महत्त्वाच्या कामांसाठी नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागतात, असा आरोप करण्यात आला. अनेक कामे महिनोन्महिने प्रलंबित राहत असल्याचा दावाही यावेळी करण्यात आला.

विशेषतः शेतकरी आपल्या जमिनीशी संबंधित कामांसाठी तहसील कार्यालयात गेल्यानंतर अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याची तक्रार करण्यात आली. कामकाजात टाळाटाळ, अनावश्यक विलंब आणि नागरिकांशी उद्धटपणे वागणूक केली जात असल्याचा आरोपही पदाधिकाऱ्यांनी केला.

चौकशी व निलंबनाची मागणी

तहसील कार्यालयातील कथित भ्रष्टाचार आणि अनियमिततेची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि तहसीलदारांचे तातडीने निलंबन करावे, अशी मागणी २५ नोव्हेंबरच्या मोर्चाद्वारे करण्यात येणार आहे.

नागरिकांची कामे वेळेत व्हावीत, त्यांना न्याय मिळावा आणि महसूल प्रशासनाने जनतेच्या तक्रारींचा गांभीर्याने विचार करावा, या उद्देशाने हे आंदोलन सुरू करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

'तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्याची वेळ येणे गंभीर'

पत्रकार परिषदेसाठी उपस्थित भाजपचे ज्येष्ठ नेते प्रदीप गारटकर यांनी या आंदोलनात समाजातील सर्व सज्जन शक्तींनी सहभागी होण्याचे आवाहन केले. ह्हा मोर्चा केवळ राजकीय नेतृत्वाचा नसून जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी आहे. त्यामुळे इंदापूर तालुक्यातील नागरिकांनी २५ नोव्हेंबर रोजी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे,ह्ह असे त्यांनी सांगितले.

भाजपचे प्रवीण माने यांनी आपल्या भूमिकेत म्हटले की, इंदापूरच्या इतिहासात तहसील कार्यालयाच्या कारभाराविरोधात अशा प्रकारे सर्वपक्षीय मोर्चा काढण्याची वेळ येणे हीच गंभीर बाब आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी सर्व पक्ष आणि संघटनांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पत्रकार परिषदेला उपस्थिती

या पत्रकार परिषदेसाठी भाजपचे प्रदीप गारटकर, प्रवीण माने आणि आकाश कांबळे; भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे इंदापूर तालुका अध्यक्ष निवास शेळके; राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) चे महारुद्र पाटील; महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राजेंद्र हजारे; शिवसेना (एकनाथ शिंदे गट) चे नितीन शिंदे व महादेव सोमवंशी; रयत क्रांती सेनेचे निलेश देवकर; भटक्या विमुक्त जमाती संघटनेचे तानाजी धोत्रे; स्वाभिमानी लहुजी सेनेचे संतोष मोरे तसेच भीमा कोरेगाव विजयस्तंभ सेवा संघाचे शरद चितारे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

२५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या या मोचार्मुळे इंदापूर तालुक्यातील महसूल प्रशासनावर राजकीय व सामाजिक दबाव वाढण्याची शक्यता आहे. तहसील कार्यालयातील कामकाजात सुधारणा व्हावी, नागरिकांच्या प्रलंबित कामांचा तातडीने निकाल लावावा आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, यासाठी हे आंदोलन सुरू करण्यात येत आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नातून नगर परिषदेला अत्याधुनिक यांत्रिक सफाई मशीन

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर नगरीच्या स्वच्छतेला आता अधिक गती मिळणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री मा. एकनाथ शिंदे साहेब यांच्या प्रयत्नातून पंढरपूर नगर परिषदेला अत्याधुनिक यांत्रिक रस्ते सफाई मशीन उपलब्ध करून देण्यात आले आहे. या मशीनचा लोकार्पण सोहळा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.



पंढरपूर येथे वर्षभरात आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री अशा चार प्रमुख यात्रा भरतात. यामध्ये आषाढी वारी हा सर्वात मोठा धार्मिक सोहळा असून या कालावधीत राज्यासह देशभरातून सुमारे ३० लाखांहून अधिक भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरीत दाखल होतात. भाविकांची वाढती संख्या, शहरातील विस्तारणारे नागरीकरण आणि यात्राकाळातील प्रचंड गर्दी लक्षात घेता शहरातील रस्ते, बाजारपेठा, प्रमुख चौक तसेच गर्दीच्या ठिकाणांची नियमित स्वच्छता राखणे हे नगर परिषदेसमोरील महत्त्वाचे आव्हान आहे.

सध्या पंढरपूर नगर परिषदेकडे रस्ते स्वच्छतेसाठी केवळ एकच यांत्रिक सफाई मशीन उपलब्ध असल्याने संपूर्ण शहराची दैनंदिन स्वच्छता प्रभावीपणे करणे अडचणीचे ठरत होते. ही बाब लक्षात घेऊन शहराच्या स्वच्छतेसाठी आणखी एका आधुनिक मशीनची आवश्यकता होती.

याच पार्श्वभूमीवर पंढरपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा डॉ. प्रणिता ताई भगीरथ भालके यांनी शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न गांभीर्याने घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नवीन Mechanized Sweeping Machine उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. नगराध्यक्षांच्या या मागणीची उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी तातडीने दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला आणि पंढरपूर नगर परिषदेला ही अत्याधुनिक मशीन उपलब्ध करून दिली.

या मशीनमुळे शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठा, सार्वजनिक ठिकाणे आणि गर्दीच्या परिसराची स्वच्छता अधिक जलद, नियमित व प्रभावीपणे करता येणार आहे. तसेच मनुष्यबळावरील ताण कमी होण्यास मदत होऊन शहरातील धूळ, कचरा आणि अस्वच्छतेवर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. विशेषतः आषाढी व कार्तिकी यात्रेच्या काळात लाखो भाविकांना स्वच्छ आणि सुंदर पंढरपूरचा अनुभव देण्यासाठी या मशीनचा मोठा उपयोग होणार आहे.

पंढरपूरच्या धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्वाला साजेसे स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी शहर निर्माण करण्याच्या दृष्टीने नगराध्यक्ष डॉ. प्रणिता ताई भगीरथ भालके यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. नगराध्यक्षांच्या मागणीची तातडीने दखल घेऊन मशीन उपलब्ध करून दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांचे नागरिकांमधून आभार व्यक्त होत आहेत.

भाविकांची वाढती संख्या, यात्रेचे नियोजन आणि शहराच्या स्वच्छतेची गरज लक्षात घेता उपलब्ध झालेली ही अत्याधुनिक मशीन पंढरपूरच्या स्वच्छता व्यवस्थेला निश्चितच बळकटी देणारी ठरणार आहे.

वात्रटिका

फाडाफाडी

ज्यांच्या असण्या, दिसल्याने
अनेकांची फाटत होती...
आज ते नाहीत तर कोणी
त्यांचाच फोटो फाडला...
कारण काही असले तरी
कृतीचे समर्थन होत नाही...
राग व्यक्त केला कोणावर नि
वाद कोणाचवर ओढावला...

हणमंत पडवळ
धाराशिव
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादक: पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागार: ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

पुणे विभागातील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांनी जातवैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- इयत्ता 11 वी व 12 मध्ये शिक्षण घेत असलेल्या व पुढील शैक्षणिक वर्षामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना त्यांचे जात पडताळणीचे प्रस्ताव ऑनलाईन आवश्यक कागदपत्रांसह संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे कार्यक्षेत्र विचारात घेऊन संबंधित समिती कार्यालयास प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या 30 नोव्हेंबर, अखेर पर्यंत सादर करावेत.

या समितीच्या कार्यक्षेत्रत पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर,व सोलापूर जिल्ह्यांचा समावेश असून या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना ठएएळ, उएळ,खएए सारख्या प्रवेश परिक्षा करीता वैधता प्रमाणपत्राची गरज भासत असल्याने अशा विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की, जात वैद्याता प्रमाणपत्राच्या प्रकरणासाठी खालीलप्रमाणे कागदपत्रांची आवश्यकता असून अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती , पुणे, कार्यालय पत्ता - कपिल टॉवर्स,सी विंग ,पाचवा मजला, पुणे आरटीओ कार्यलया शेजारी ,संगम पुलाजवळ पुणे411001, संपर्क क्रमांक-020-26057961 या पत्त्यावर संबंधीत अनुसुचित जमात (ST) प्रवर्गाच्या अर्जदाराने ऑनलाईन अर्ज आगोदर प्रमाण प्रणाली http://etribevalidity.mahaonline.gov.in संकेत स्थळावर भरणे अनिवार्य आहे व त्याची एक प्रत ऑफलाईन पद्धतीने या समितीस सादर करणे अनिवार्य आहे.

अर्जा सोबत जोडावयाची कागदपत्रे-

शाळा/ कॉलेज यांचे पत्र, ऑनलाईन आदि प्रमाण प्रणालीव्दारे भरलेला अर्ज (नमुना ई मधील) जोडावे, उपविभागीय अधिकारी यांचे कडील (नमुना सी मधील जातीचे मूळ प्रमाणपत्र व झेरॉक्स जोडावे., नाते संबंध दर्शविणारे वंशावळीचे प्रतिज्ञापत्र (नमुना फ मधील) रू.100/- च्या स्टॅम्पपेपर असलेला जाडावे. रक्त संबंधातील नातेवाईकांची वैद्यता प्रमाणपत्रे उपलब्ध असल्यास त्यासोबत रू. 500/- च्या स्टॅम्पपेपर व प्रतिज्ञापत्र सोबत जोडावे, अर्जदाराचा प्राथमिक शाळा सोडल्याचा दाखला जोडावे, अर्जदाराचा माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला जोडावे, अर्जदाराचा शालेय प्रवेश नोंदवहीचा उतारा जोडावे, अर्जदाराचे आधारकार्ड प्रत जोडावे, अर्जदाराचे जन्मनोंद प्रत जोडावे, बोनाफाईड सर्टिफिकेट प्रत जोडावे, वडीलांचे प्राथमिक/ माध्यमिक शाळा सोडल्याचे दाखले, वडीलांचा शालेय प्रवेश नोंदवहीचा उतारा , अर्जदाराचे वडीलांचे आधारकार्ड प्रत जोडावे, अर्जदाराचे वडीलांचे जन्म नोंद प्रत / दाखला प्रत जोडणे, सख्खे काका/ सख्खी आत्त्या / चुलत काका / चुलत आत्त्याचे प्राथमिक/ माध्यमिक शाळा सोडल्याचे दाखला प्रत व गाव नमुना-14 जन्म मृत्यू नोंद उतारा सोबत जोडावे. काकांचे शालेय प्रवेश नोंदवहीचा उतारा जोडावे, सख्खे आजोबा / सख्खी आजी /चलत आजोबा/ चुलत आजी यांचे प्राथमिक /माध्यमिक शाळा सोडल्याचे दाखला जोडावे व गाव नमुला -14 जन्म मृत्यू नोंद उतारा सोबत जोडावे, आजोबांचे शालेय प्रवेश नोंदवहिचा उतारा जोडावे, आजोबांचे मृत्यू प्रमाणपत्र, सख्खे पंजोबा/ सख्खी पंजी/ चुलत पंजोबा/ चुलत पंजी यांचे प्राथमिक - माध्यमिक शाळा सोडल्याचे दाखले जोडावे.

चुलत काका /चुलत काकू/ चुलत आजी/ चुलत आजोबा/ चुलत पंजोबा/चुलत पंजी/ यांचा पुरावा असल्यास रु.500/- च्या स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहिल. पंजोबाचा शालेय प्रवेश नोंदवहिचा उतारा जोडावे. आदिवासी नोंद असल्यास 7/12 उतारा/ फेरफार /बंदोबस्त मिसल/ पी 1/ पी 2 /पी 6/ पी 9 / वनहक्क पट्टे आदेश प्रत जोडावे, इतर 1950 पुर्वीचे दस्ताऐवज असल्याचा पुरावा पुरावा जोडावे, रक्तसंबंधातल इतर नातेवाईकांचे प्राथमिक /माध्यमिक शाळा सोडल्याचे दाखले प्रवेश नोंदवहीचे उतारे जोडणे, अनुसुचित जमातीचे दाव्यासंबंधी अन्य कोणतेही दस्तऐवज किंवा पुरावे जोडावे, न्यायालयीन आदेश तसेच प्रकरणाशी संबंधीत इतर माहितीचे पुरावे असल्यास जोडावे.

अशी माहिती सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती (पुणे विभाग) यांनी दिली आहे.

बार्शी तालुक्यात भूमिगत पाईपलाईनला छिद्र पाडून साडेआठ लाखांचे डिझेल चोरीला

बार्शी (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या भूमिगत इंधन वाहिनीला छिद्र पाडून लाखो रुपयांचे डिझेल चोरीला गेल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.



उपळाई ठोंगे गावच्या हद्दीतील शेतातून जाणाऱ्या पेट्रोलियम वाहिनीवर अज्ञात चोरट्यांनी लोखंडी व्हॉल्व्ह बसवून अंदाजे ८ लाख ५० हजार रुपयांचे डिझेल चोरल्याचे समोर आले आहे. या प्रकारामुळे इंधन वाहिनीच्या सुरक्षिततेचा तसेच परिसरातील नागरिकांच्या जीविताला संभाव्य धोका निर्माण झाल्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या पाकणी येथून जाणाऱ्या भूमिगत पाइपलाईनमधून पेट्रोलियम पदार्थांची वाहतूक केली जाते. दरम्यान, ७ ऑक्टोबरच्या मध्यरात्री ते ८ ऑक्टोबरच्या पहाटेच्या दरम्यान या पाइपलाईनमधील दाब अचानक कमी झाल्याचे कंपनीच्या नियंत्रण कक्षाच्या निदर्शनास आले. पाइपलाईनमधील दाब सतत कमी होत असल्याने इंधन चोरीची शक्यता व्यक्त करण्यात आली.

यानंतर कंपनीचे कर्मचारी आणि पोलिसांनी गणेगाव ते पानगाव परिसरात रात्री गस्त घालून संशयास्पद ठिकाणांची तपासणी केली. मशीनच्या सहाय्यानेही पाइपलाईनची तपासणी करण्यात आली; मात्र सुरुवातीच्या तपासात चोरीचे ठिकाण निश्चित झाले नाही. त्यामुळे कंपनीकडून पुढील तांत्रिक तपासणी करण्यात आली.

अखेर कंपनीने 'इन-लाईन इन्स्पेक्शन सर्व्हे' केला. या सर्व्हेच्या माध्यमातून पाइपलाईनमधील संशयास्पद ठिकाणाचा शोध घेण्यात आला. त्यानंतर १८ नोव्हेंबर रोजी उपळाई ठोंगे गावच्या हद्दीतील शेती गट क्रमांक ८१६ मध्ये भूमिगत पाइपलाईनवर लोखंडी व्हॉल्व्ह बसविल्याचे आढळून आले. या व्हॉल्व्हच्या माध्यमातून पाइपलाईनमधील डिझेल चोरी करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, चोरी झालेल्या डिझेलची किंमत अंदाजे ८ लाख ५० हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

भूमिगत इंधन वाहिनीला छिद्र पाडून त्यावर व्हॉल्व्ह बसविणे आणि त्याद्वारे इंधन काढणे हा प्रकार अत्यंत गंभीर मानला जात आहे. डिझेलसारख्या ज्वलनशील पदार्थाची अशा प्रकारे चोरी करताना आग, स्फोट किंवा इतर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे केवळ आर्थिक चोरीच नव्हे, तर परिसरातील सुरक्षिततेच्या दृष्टीनेही हा प्रकार चिंताजनक ठरत आहे.

या प्रकरणी इंडियन ऑईलचे वरिष्ठ अभियंता शुभम गायकवाड यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत घोळवे पुढील तपास करीत आहेत.

पाइपलाईनमधून लाखो रुपयांचे डिझेल चोरी करणाऱ्या या अज्ञात आरोपींचा शोध घेण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर आहे. या चोरीमागे नेमके कोण आहे, पाइपलाईनला छिद्र पाडण्यासाठी कोणती यंत्रणा वापरण्यात आली आणि चोरीचे डिझेल कुठे विक्री करण्यात आले, याचा तपासातून उलगडा होण्याची शक्यता आहे.

सोलापूर च्या सुकन्या त्वरिता खटके यांना शुटींग मध्ये कांस्यपदक

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी गोवा येथे आयोजित महाराष्ट्र स्टेट रायफल शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत कु. त्वरिता सूर्यकांत खटके हिने उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदक (Bronze Medal) पटकावून आपल्या यशाचा मानाचा तुरा रोवला!

या यशामागे तिची मेहनत, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण सराव यांचा मोलाचा वाटा आहे. तसेच ती सराव करत असलेल्या जीएफजी अकॅडमी, पुणे येथील प्रा. परमेश्वर आणि क्रीडा शिक्षक शुभम यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. त्वरिता ही सोलापूरचे सुपुत्र मॅरॅथॉन कौशल्य विकास विभाग सहाय्यक आयुक्त



सूर्यकांत खटके यांची सुकन्या आहे.

त्वरिताच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तिचे, तिच्या पालकांचे तसेच तिला मार्गदर्शन करणाऱ्या परमेश्वर सर आणि शुभम सर यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

शेतकऱ्यांनी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी व्हावे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणेसाठी महाराष्ट्र शासनाने राज्यात उत्पादनावर आधारीत सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप 2026 व रब्बी हंगाम 2026-27 या 1 वर्षाकरीता अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरुन राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. रब्बी हंगाम 2026-27 मध्ये सोलापूर जिल्ह्याकरीता गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत), हरभरा, उन्हाळी भुईमुग व रब्बी कांदा या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित महसूल मंडळ / क्षेत्रात शेतकऱ्यांना सहभाग घेता येईल.

सदर योजनेतील सहभाग हा कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक असून योजनेत सहभाग घेण्याची अंतिम मुदत रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत) करिता दिनांक 30 नोव्हेंबर 2026, गहु (बागायत), हरभरा, रब्बी मका व रब्बी कांदा या पिकाकरिता दिनांक 15 डिसेंबर, 2026 व उन्हाळी भुईमूग या पिकाकरिता दिनांक 31 मार्च, 2027 अशी आहे. त्यासाठीचे PMFBY पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. कर्जदार शेतक-यांना योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज मंजूर करणाऱ्या बैंकमार्फत योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज भरुन देणे आवश्यक आहे. जर कर्जदार शेतकरी योजनेत सहभागी होणार नसेल तर तसे त्याने नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस आधी कर्ज मंजूर करणा-या बँकेस लेखी कळविणे आवश्यक आहे.

त्यामुळे सर्व शेतक-यांना आवाहन करण्यात येते की, रब्बी हंगाम 2026-27 मध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजनेचे पोर्टल https://pmfby.gov.in वर स्वतः शेतकरी यांनी तसेच बँक, विमा कंपनीने नियुक्त केलेले एजेंट, क्रॉप इन्शुरन्स ॲप व सामुहिक सेवा केंद्र (CSC) यांचे मार्फत योजनेतील सहभागाची नोंदणी करावी.

अधिक माहितीसाठी तात्काळ आपल्या संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, तालुका कृषि अधिकारी यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरात सलग तीन दिवस अतिक्रमण हटाव मोहीम

आपत्कालीन सेवांसाठी रस्ते केले मोकळे; अनधिकृत अतिक्रमण केल्यास कठोर कारवाईचा इशारा

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी वारी महायात्रा २०२६ च्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहरात दाखल होणाऱ्या लाखो भाविकांची सुरक्षितता आणि गर्दीचे नियोजन लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार शहरात सलग तीन दिवस विशेष अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. पंढरपूर नगरपरिषद, जिल्हा प्रशासन आणि पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही धडक कारवाई करण्यात आली. असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

रविवार, दि. १५ नोव्हेंबर ते मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर या कालावधीत शहरातील प्रमुख रस्ते, मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग आणि चंद्रभागा वाळवंट परिसरातील अनधिकृत अतिक्रमणे हटविण्यात आली.

पहिल्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्टेशन रोड, चौफाळा ते महाद्वार घाट, अहिल्यादेवी चौक ते गजानन महाराज मंदिर तसेच चंद्रभागा वाळवंट परिसरातील अतिक्रमणे हटविण्यात आली. यामध्ये अनधिकृत टपऱ्या आणि उसाच्या दुकानांचाही समावेश होता. संबंधित व्यावसायिकांना सार्वजनिक जागेवर पुन्हा अतिक्रमण न करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

दुसऱ्या दिवशी स्टेशन रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चौफाळा रोड आणि गांधी रोड ते प्रदक्षिणा मार्गावरील अतिक्रमणे हटविण्यात आली. चौफाळा ते मंदिर परिसरातील दुकानदारांना दुकाने व विक्रीचे साहित्य पांढऱ्या पट्टीच्या आत ठेवण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या.

तिसऱ्या दिवशी चौफाळा ते मंदिर परिसरातील पांढऱ्या पट्टीबाहेरील अतिक्रमणे हटविण्यात आली. तसेच प्रदक्षिणा मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अर्बन बँक आणि गजानन महाराज मठ ते भक्ती मार्ग या परिसरातील रस्त्यांवरील अतिक्रमणे काढण्यात आली.

या संयुक्त मोहिमेसाठी तीन दिवसांत पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. पहिल्या दिवशी २ पोलीस अधिकारी व ४ कर्मचारी, दुसऱ्या दिवशी ३ पोलीस अधिकारी, ८ कर्मचारी व ५ होमगार्ड, तर तिसऱ्या दिवशी २ पोलीस अधिकारी, ९ कर्मचारी व १० होमगार्ड यांची नियुक्ती करण्यात आली होती.

कार्तिकी वारीदरम्यान वारकऱ्यांना रुग्णवाहिका, अग्निशामक दल यांसारख्या आपत्कालीन सेवा विनाव्यत्यय उपलब्ध व्हाव्यात, तसेच गर्दीच्या ठिकाणी चेंगराचेंगरीसारखी दुर्घटना टाळता यावी, यासाठी रस्ते व सार्वजनिक जागा मोकळ्या ठेवणे आवश्यक आहे. या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत जिल्हा प्रशासनाचे अधिकारी, नगरपरिषदेचे अधिकारी व २० कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि होमगार्ड यांनी सहभाग घेतला.

सोलापूर महानगरपालिका,सोलापूर
विभागीय कार्यालय क्र.५, गुरुनानक चौक, साधु वासवानी उद्यान, सोलापूर.

पहिली जाहीर प्रसिद्धीकरण निविदा

अ.क्र.	सो.म.पा संकेतस्थळ वरील TENDER ID
१	7026
२	7027
३	7028
४	7029

वर नमूद कामाचे टेंडर सो.म.पा.च्या www.solapurcorporation.gov.in या वेबसाईटवर दि. १७/११/२०२६ ते दि. २७/११/२०२६ दुपारी ०१.०० वाजेपर्यंत पाहणेस उपलब्ध आहे.

सही/-
विभागीय अधिकारी
विभागीय कार्यालय क्र.०५

सुर्डीत घरासमोर येऊन महिलेला मारहाण; तिघांविरुद्ध बार्शी तालुका पोलिसांत गुन्हा दाखल

बार्शी (कटूसत्य वृत्त):- बार्शी तालुक्यातील सुर्डी येथे आई-वडिलांना घरी आणण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका महिलेला मारहाण करून शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, सुनिता मिठू पवार (वय ४५, व्यवसाय घरकाम, रा. सुर्डी, ता. बार्शी) यांच्या घरासमोर दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, अनिल मोहन काळे, आश्विनी अनिल काळे आणि साहिल अनिल काळे (सर्व रा. सुर्डी, ता. बार्शी) हे तिघे फिर्यादीच्या घरासमोर आले. आई-वडिलांना घरी आणायचे नाही, या कारणावरून त्यांनी वाद घालत फिर्यादीला काठीने मारहाण केली, शिवीगाळ केली तसेच कुऱ्हाड व कोयत्याने मारहाण करण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

तसेच, आमच्या नादी लागल्यास जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचेही फियादींत नमूद करण्यात आले आहे. या घटनेत फिर्यादी महिलेला मारहाण झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी सुनिता मिठू पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अनिल मोहन काळे, आश्विनी अनिल काळे आणि साहिल अनिल काळे यांच्याविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७३/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अन्वये दिनांक १९ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ३.०७ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलीस हेडकॉन्स्टेबल मंगरुळे यांनी केली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गवळी करीत आहेत.

या प्रकरणातील आरोप हे फिर्यादीच्या तक्रारीवर आधारित असून, तपासाअंती पुढील तथ्य स्पष्ट होणार आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत 'एआय' साक्षरतेचे धडे

'मिशन १ मिलियन' अंतर्गत १० लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जागतिक एआय शिक्षण संस्था 'कोड ए आय' आणि 'एनपॉवर' यांच्यातील सामंजस्य करारानुसार देशभरातील विद्यार्थ्यांना मोफत कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरतेचे धडे देण्यासाठी 'लर्न एआय विथ फन' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. महाराष्ट्रात रयत शिक्षण संस्थेच्या सहकार्याने हा उपक्रम थेट शाळांपर्यंत पोहोचवला जात असून, या माध्यमातून देशभरातील १० लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे 'मिशन १ मिलियन' हे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

अनेक कार्यक्रम केवळ प्रॉम्प्ट इंजिनिअरिंगपुरते मर्यादित असतात, परंतु हा उपक्रम खेळावर आधारित शिक्षणाद्वारे एआय निर्णय कसे घेते आणि माहितीवर प्रक्रिया कशी करते, यावर भर देतो. यामध्ये एक तासाचा 'अवर ऑफ एआय', चार तासांचा एआय साक्षरता प्रमाणपत्र कार्यक्रम, शिक्षक प्रशिक्षण आणि एआय करिअर मार्गदर्शन या चार मुख्य घटकांचा समावेश आहे. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांना मोफत प्रमाणपत्र दिले जाते.

"कोणताही विद्यार्थी सामाजिक-आर्थिक किंवा भौगोलिक पार्श्वभूमीमुळे एआयच्या प्राथमिक ज्ञानापासून वंचित राहू नये, हा आमचा मुख्य उद्देश आहे," असे प्रतिपादन एनपॉवर चे संस्थापक व सीईओ सुशील मुणगेकर यांनी केले.

नुकत्याच पार पडलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या दक्षिण विभागातील शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमात सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि बेळगाव जिल्ह्यांतील ९० शाळांमधील १८० शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अध्यक्षा व पुरस्कारप्राप्त मुख्याध्यापिका श्रीमती सरोज पाटील (माई) आणि उपनिरीक्षक वालवेकर उपस्थित होते.

"विद्यार्थ्यांना भविष्यासाठी सज्ज करण्याकरिता एआय शिक्षण अनिवार्य असून, यामुळे मुलांमध्ये जिज्ञासा आणि आत्मविश्वास निर्माण होईल," असे मत श्रीमती पाटील यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रासह आता राजस्थान, गुजरात आणि आंध्र प्रदेशातील शाळांमध्येही या उपक्रमाचा विस्तार होत आहे.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल
सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.


वर-वधू



जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) नेहरू यांच्या नंतरचे भारताचे एक पंतप्रधान २) जवळीक, चिकटून राहणे ३) दिल्लीचे मुख्यमंत्री ४) बड उलट लिहा ५) पंढरीला नियमित जाणारे भाविक ६) भारताचे माजी राष्ट्रपती-*** मुखर्जी ७) बोलावण्यासाठी दिलेली साद ८) डाळ शिजताना होणारा आवाज ११) बे पंचे १३) श्रीरामाने या सेनेच्या मदतीने लंकेवर विजय मिळवला १७) मेंदू १८) वास, गंध २०) राक उलट लिहा २२) भित्रा, भ्याड २४) किंमती ऐवज, वस्तू २५) पाकचे माजी पंतप्रधान-*** शरीफ २६) आश्चर्य ३१) नवा कोरा, न चुरघळलेला ३२) खर्चात केलेली बचत ३४) लग्नातील नवरी मुलगी ३५) एक म्हण-** करी काम ३६) आकाशात उंचावरून घिरट्या मारणारा पक्षी ३८) उन्हाळा (इंग्रजीत) ४०) सर्व (हिंदीत) ४१) पाण्यात विहरणारा एक सफेद रंगाचा पक्षी ४२) जरचा साथीदार ४४) सभोवताली घातलेला गर्दीचा वेढा ४६) श्रवणेंद्रिय ४७) पक्ष्याचे पंख, परंतु (हिंदीत) ४८) कुलुपाची चावी

आडवे शब्द : १)भाजप उभारणीतील वाजपेयी यांचे सच्चे साथीदार ६)आ. बच्चू कडू यांची संघटना ९) घराची तुळई १०) ताणला जाणारा लवचिक पदार्थ ११) मजबूत १२) तंबाखू वा इतर साहित्य ठेवण्याची छोटी पिशवी १४) हव्यास, स्वार्थी भावना १५) दहा गुणिले नऊ १६) सायकलचे चाक, कागदी दस्त्यांचे माप १८) वर्गातील मुलांची एकूण संख्या १९) वाढदिवशी हा कापतात २१) भाजप नेते-नितीन **** २३) श्रीविष्णू पत्नी, लक्ष्मी देवी २५) समोर झालेली दृष्टीभेट २७) निवडणुकीत उमेदवाराला हे दान करतात, व्होट २८) पांघरण्याचे उबदार वस्त्र २९) भाविकांचे पंढरपूरला पायी जाणे ३०) एक म्हण-बडा घर *** वासा ३२) रात्री चमकणारा किटक ३३) पटकन, लगेच ३६) डोंगरातील वळणाचा रस्ता ३७) लहान बाळाला ही टोचतात ३९) शपथ (हिंदीत) ४१) प्रगती, भरभराट ४३) पैसे (इंग्रजीत) ४४) श्रीमंतच्या विरूध्दार्थी शब्द ४५) राज्य चालविणारे शासन ४७) भाकरी थापण्याची मोठी थाळी ४९) रंग (इंग्रजीत) ५०) याची धाव कुंपणापर्यंत अशी एक म्हण आहे ५१) भारताची राजधानी

सुडोकु - 103

9			1	3			8	
								7
8			7	6	4	9	1	2
6					9	1		8
5		3	8	7		6		9
				5			7	4
	1	9	4					5
			9			2	4	3
		2	6	8	3	7		

पाठांतरापेक्षा विचारप्रवर्तक पिढी घडवा - राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

एमआयटी तर्फे 'रिजनल रिसर्च सिम्पोजियम ऑन पीबीएल' आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

पुणे, (कटूसत्य वृत्त):- 'पारंपरिक शिक्षणपद्धती ऐवजी विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची, स्वतंत्रपणे विचार करण्याची आणि स्वतः समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता विकसित करणे ही काळाची गरज आहे. प्रकल्प व समस्याधारित शिक्षण ही नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची खरी ताकद असून, त्यातून केवळ नोकरी शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक घडतील,' असे प्रतिपादन शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील समन्वय वाढविण्याच्या उद्देशाने सोलापूर येथील एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे आयसर पुणे येथे चौथ्या 'रिजनल रिसर्च सिम्पोजियम ऑन प्रोजेक्ट अँड प्रॉब्लेम-बेस्ड लर्निंग' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन आयसर पुणे येथे करण्यात आले आहे. शालेय शिक्षणावरील प्रादेशिक संशोधन परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे होत्या तर पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील विशेष अतिथि म्हणून उपस्थित होते. डेन्मार्कमधील अलबोर्ग विद्यापीठाच्या युनेस्को पीबीएल सेंटरच्या संचालिका प्रा. क्झियानग्यून डू, अगस्त्या इंटरनॅशनल फाऊंडेशनचे कार्यकारी उपाध्यक्ष के. त्यागराजन, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे संस्थापक-कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी आणि संचालक राघवेंद्र चाटे आदी उपस्थित होते.



शिक्षणासह सर्वच क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या (एआय) तंत्रज्ञानाचा वापर अटळ झाला आहे. या नवतंत्रज्ञानाने विद्यार्थ्यांची सृजनशीलता वाढवली पाहिजे, त्याला यंत्रवत बनवता कामा नये. फक्त शिक्षकच विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षणातून एआयचा वापर मानवाच्या कल्याणासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी कसा करावा हे शिकवू शकतात. 'एमआयटी'सारख्या अग्रगण्य शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांकडे विद्यार्थ्यांच्या ऊर्जेला सकारात्मक दिशा देण्याची ताकद आहे.

- डॉ. पंकज भोयर, शालेय शिक्षण राज्यमंत्री

डॉ. पंकज भोयर म्हणाले 'पूर्वेचे ऑक्सफर्ड ऑफ ईस्ट' अशी ओळख असलेल्या पुण्याचा शैक्षणिक वारसा समृद्ध करण्यात 'एमआयटी' शिक्षण संस्थेचे योगदान मोलाचे असून, विज्ञान आणि अध्यात्म यांना एकत्र आणून शिक्षण देण्याच्या प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या स्वप्नपूर्तीकडे एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. 'विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समस्या देऊन त्यावर उपाय शोधण्याची संधी दिल्यास त्यांची जिज्ञासा आणि चिकित्सक विचारक्षमता वाढेल. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि रोबोटिक्सच्या युगात शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांना सृजनशील बनविण्यासाठी करावा,' असे आवाहन त्यांनी केले.

गजानन पाटील यांनी समस्या-आधारित शिक्षणाचा विस्तार अभियांत्रिकी आणि उच्च शिक्षणापुरता मर्यादित न ठेवता शालेय स्तरापर्यंत करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रा. स्वाती कराड चाटे यांनी शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षण यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी संशोधन व नावीन्यपूर्ण विचारांची रुजुवात शालेय स्तरापासूनच होण्याची गरज व्यक्त केली. 'समस्या-आधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, सर्जनशीलता, सहकार्याची भावना आणि संवादकौशल्य विकसित होईल. शिक्षणपद्धती ही भारतीय समाजाच्या गरजा आणि समस्यांशी सुसंगत असावी. जगातील सर्वोत्तम शैक्षणिक पद्धती स्वीकारताना भारतीय संस्कृती आणि मूल्यांचे जतनही झाले पाहिजे,' असे त्यांनी नमूद केले. प्रा. क्झियानग्यून डू यांनी शाश्वत शैक्षणिक बदल आणि विद्यार्थ्यांच्या विकसनात समस्या-आधारित शिक्षणाचे महत्त्व विशद केले. के. त्यागराजन यांनी शिक्षणशास्त्रात समस्याधारित शिक्षणाला वाढती पसंती अधोरेखित केली.

या परिसंवादात डेन्मार्क, दक्षिण आफ्रिका, सिंगापूर आणि भारतातील शिक्षणतज्ज्ञ सहभागी झाले आहेत. समस्या व प्रकल्पाधारित शिक्षणाच्या जागतिक व भारतीय सर्वोत्तम पद्धतीविषयी विचारमंथन याठिकाणी केले जाणार आहे. प्रत्यक्ष कृती, अनुभव, संशोधन आणि सहकार्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी देणे, हा या परिसंवादाचा प्रमुख उद्देश आहे. कुलसचिव डॉ. कृष्णकेदार गुमास्ते यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि श्रीप्रिया प्रतिनिधि यांनी सूत्रसंचालन केले.

कार्तिकी वारीच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून पंढरपूरातील सुविधांची पाहणी

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त): कार्तिकी वारी २०२६ च्या अनुषंगाने प्रशासनाने वारकऱ्यांसाठी केलेल्या नियोजन व सुविधांची पाहणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूर येथील ६५ एकर (भक्ती सागर), वाळवंट, चंद्रभागा नदीपात्र परिसराला भेट दिली. यावेळी त्यांनी पंढरपूर नगरपरिषदेच्या आधुनिक स्वच्छता वाहनाचे उद्घाटन केले. त्यानंतर आरोग्य शिबिराला भेट देऊन रुग्णांशी संवाद साधला तसेच आपत्कालीन मदत केंद्रातील सुविधांची माहिती घेतली.

भक्ती सागर परिसरातील नदी घाटावर जाऊन त्यांनी घाटाच्या स्वच्छतेची पाहणी केली. यावेळी स्वतः पाण्याचा फवारा मारून स्वच्छता केली. वारकरी भाविकांशी संवाद साधत त्यांच्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या सुविधांची माहिती घेतली. परिसरातील भजनी मंडळांच्या सहभागाने विठ्ठलनामाचा गजर सुरू असताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनीही भक्तीमय वातावरणाचा अनुभव घेतला.

भक्ती सागर (६५ एकर) परिसरातील काही भागाचे काँक्रिटीकरण करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. तसेच परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचे निर्देश दिले. आवश्यक विकासकामांसाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. तसेच वारकरी व भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याचे मोफत उपलब्धता करण्यात आली आहे त्याचे उद्घाटन त्यांनी केले.





तसेच भक्ती सागर (६५ एकर) येथे चक्कर येऊन पडलेल्या भाविकांना तात्काळ या रुग्णालयात उपचार देण्यात आले यावेळी त्यांनी भाविकाच्या तब्बतेची विचारपूस केली.

त्यानंतर चंद्रभागा नदीच्या वाळवंट परिसरात वारकऱ्यांसाठी प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधांची पाहणी केली. यावेळी वारकऱ्यांसाठी मोफत पाणी बॉटल चे वितरण त्यांच्या हस्ते करण्यात आले. भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या शौचालयांची स्वच्छता, पाणीपुरवठा व्यवस्था तसेच परिसरातील स्वच्छतेची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या. वाळवंटात आरोग्य विभागाच्या वतीने उभारण्यात आलेल्या रुग्णालयाची पाहणी केली. नदीपात्रात उजनी धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्याबाबतही त्यांनी माहिती घेतली. नदीपात्रात बोट व होडीतून प्रवास करणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी लाईफ जॅकेट अनिवार्य करण्याबाबत संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. त्यांनी स्वतःही लाईफ जॅकेट घालून बोटीतून प्रवास केला.

पत्राशेड येथील दर्शन रांगेची पाहणी केली. तसेच या ठिकाणी प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करण्यात आलेल्या सोयीसुविधांची ही पाहणी केली. या ठिकाणी भाविकांसाठी मोफत पाणी बॉटल वाटप च वितरणही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी भाविकांशी संवाद साधला व प्रशासनाने उपलब्ध केलेल्या सुविधा विषयी त्यांचे मते जाणून घेतली.

उपमुख्यमंत्री यांच्याकडून श्री विठ्ठलाचे मुखदर्शन

सर्वसामान्य वारकरी भाविक हा पायी चालत श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपुरात येतो. येथे अनेक तास दर्शन रांगेत थांबतो. तो वारकरीच खरा व्हीआयपी आहे, त्यामुळे त्या वारकऱ्याला वेळेत व सुलभ दर्शन मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः श्री विठ्ठलाचे मुखदर्शन घेतले.

तनपुरे मठ येथे आंबे दुर्घटनेतील मृत कामगारांच्या नातेवाईकांची सांत्वनपर भेट

आंबे येथील दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबीयांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तनपुरे मठ येथे भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी राज्य शासनाच्या वतीने प्रत्येक मृत कामगाराच्या कुटुंबाला पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ही मदत 21 नोव्हेंबर 2026 रोजी कार्तिकी यात्रेच्या शासकीय महापूजेनंतर आयोजित कार्यक्रमात संबंधित कुटुंबांना धनादेशाद्वारे वितरित करण्याबाबत जिल्हा प्रशासनाला सूचना दिल्या.

तसेच, दुर्घटनेत मृत्यू झालेल्या प्रत्येक कामगाराच्या कुटुंबातील मुलाला नोकरी मिळवून देण्याची आणि मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः घेतली. या माध्यमातून दुर्घटनाग्रस्त कुटुंबांना आर्थिक आधार देण्यासोबतच त्यांच्या मुलांच्या भविष्याची काळजी घेण्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका आशिष लोकरे, नगराध्यक्ष प्रणिती भालके, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्तिकी वारीत रोबोटिक रेस्क्यू क्राफ्टच्या मदतीने १५ वर्षीय वारकऱ्याला जीवदान

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी वारी २०२६ च्या अनुषंगाने चंद्रभागा नदीपात्रात नव्याने दाखल झालेल्या चार रोबोटिक रेस्क्यू क्राफ्टच्या वापराबाबत प्रशिक्षण सुरू असतानाच पाण्यात बुडणाऱ्या एका १५ वर्षीय वारकरी भाविकाला वाचवण्यात यश आले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत तातडीने बचावकार्य करून भाविकाचे प्राण वाचवले.

चंद्रभागा नदीपात्रात चार रोबोटिक रेस्क्यू क्राफ्टच्या वापराबाबत प्रशिक्षण सुरू होते. यावेळी नदीच्या पाण्यात एक भाविक बुडत असल्याचे प्रशिक्षण घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तातडीने बचावकार्य सुरू करत आधुनिक रोबोटिक रेस्क्यू क्राफ्टच्या सहाय्याने संबंधित भाविकाला सुरक्षित बाहेर काढले. बाबलू खिलारे (वय १५, रा. मोहोळ, जि. सोलापूर) असे बचाव करण्यात आलेल्या भाविकाचे नाव आहे.



कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हा प्रशासनाकडून आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या मागणीनुसार राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून चार रोबोटिक रेस्क्यू क्राफ्ट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. एनडीआरएफ पथक आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पथकाकडून नदीपात्रात बचावकार्य सुरू असून, आधुनिक उपकरणांच्या वापराचे प्रशिक्षणही दिले जात आहे.

प्रशिक्षण सुरू असतानाच प्रत्यक्ष बचावकायार्ची संधी मिळाली आणि रोबोटिक रेस्क्यू क्राफ्टच्या मदतीने एका तरुण भाविकाचे प्राण वाचवण्यात यश आले. ही माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी दिली.

मृत व अपघातग्रस्त ऊसतोड कामगारांच्या वारसांना आर्थिक मदत

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत मृत व अपघातात जखमी झालेल्या ऊसतोड कामगारांच्या वारसांना आर्थिक मदत वितरित करण्यात येत आहे. या योजनेतून मृत ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार तसेच अपघातात जखमी झालेल्या कामगारांना त्यांच्या अपघाताच्या स्वरूपानुसार सानुग्रह अनुदान देण्यात येते.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांच्या अंतर्गत असलेल्या तसेच महाराष्ट्र राज्याच्या हद्दीतील स्थलांतरित ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांच्या



कुटुंबांना गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या सानुग्रह अनुदान योजनेचा लाभ देण्यात येतो.

या योजनेंतर्गत ऊसतोड कामगारांचा मृत्यू, अपघातामुळे कायमस्वरूपी अपंगत्व अथवा अपघातामुळे अंगभूत झालेल्या जखमा, ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांच्या वारसांना तसेच त्यांच्या कुटुंबांना अनुदान वितरित करण्यात येते. यासाठी जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. पात्र लाभार्थ्यांना अपघाताच्या स्वरूपानुसार सानुग्रह अनुदान देण्यात येते.

सन २०२६-२७ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील ऊसतोड कामगार व बेल्डेझोली/वाहतूक कामगार यांच्या अपघातानुसार एकूण २२ प्रस्तावांना लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे यांच्याकडून रक्कम मंजूर करण्यात आली आहे. यासाठी संबंधित प्रस्तावांना रु. ४५,१६,१६१/-(पाच कोटी ४५ लाख १६ हजार १६१) इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात ६ लाभार्थ्यांना अनुदान आदेश वितरित करण्यात आले. यावेळी उर्वरित लाभार्थ्यांना डी.बी.टी.द्वारे बँक खात्यावर अनुदानाची रक्कम वितरित करण्यात आली आहे.

सोलापूर उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई

सात महिन्यांत १०.५८ कोटींचा मुद्देमाल जप्त

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक मोहीम राबवली असून, गेल्या सात महिन्यांत तब्बल १० कोटी ५८ लाख ३६ हजार ३५९ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. १ एप्रिल ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत विभागाने एकूण १ हजार ९४१ गुन्हे दाखल केले असून, २ हजार ३६ जणांवर कारवाई केली आहे. या कारवाईत १९५ वाहनेही जप्त करण्यात आली आहेत. अवैध मद्याविरोधातील ही आतापर्यंतची मोठी कारवाई मानली जात आहे.

दरम्यान, १८ नोव्हेंबर रोजी मंगळवेढा-सोलापूर महामार्गावरील इचगाव टोलनाक्याजवळ गोवा राज्यात निर्मित विदेशी मद्याची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर विभागाने कारवाई केली. या कारवाईत २ हजार मिलीच्या ७१ बाटल्या आणि १८० मिलीच्या ६२४ बाटल्या, अशा एकूण ६९५ विदेशी मद्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. याशिवाय टाटा कंपनीचे इंट्रा पिकअप वाहन आणि होंडा शाईन मोटारसायकलही जप्त करण्यात आली. या प्रकरणात एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करून एकूण ११ लाख २३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सात महिन्यांच्या मोहिमेत विभागाने ७ लाख १७ हजार ८६ लिटर रसायन, ५१ हजार ३१३ लिटर हातभट्टी दारू, परराज्यातील ९ हजार ३४० बल्क लिटर मद्य, ४ हजार १४३ बल्क लिटर देशी मद्य, १ हजार ९९९ बल्क लिटर विदेशी मद्य आणि ९०७.१७ बल्क लिटर बिअर जप्त केली आहे. याशिवाय ११ हजार १८० बल्क लिटर ताडी, ३ लाख ३१ हजार ४९० रिकाम्या बाटल्या, १ लाख ३३ हजार १६० बनावट बुचे, १ लाख ५५ हजार ४०० बनावट लेबल आणि १३ हजार ८०० लिटर स्पिरिटही जप्त करण्यात आले आहे.



आयुक्त डॉ. राजेश देशमुख आणि पुणे विभागाचे विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार अधीक्षक भाग्यश्री जाधव व उपअधीक्षक सौरभ अदाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. अवैध ढाब्यांवरील मद्यविक्री, मद्यनिर्मिती आणि वाहतुकीसाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या जागामालकांनाही आरोपी करण्यात येणार असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

मिथेनॉलयुक्त बनावट दारूमुळे विषबाधा होऊन किडनी निकामी होणे, कायमस्वरूपी अंधत्व येणे आणि मृत्यू होण्याचा धोका असल्याने नागरिकांनी अशा मद्यापासून दूर राहावे, असे आवाहन अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी केले आहे. परिसरात अवैध मद्यनिर्मिती, विक्री, वाहतूक किंवा मिथेनॉल, क्लोरल हायड्रेटसारख्या पदार्थांची निर्मिती व भेसळ होत असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी १८००२३३९९९९ या टोल फ्री क्रमांकावर किंवा ८४२२००११३३ या व्हॉट्सॲप क्रमांकावर कळवावे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

कारवाईत सहभागी पथक: दुय्यम निरीक्षक शिवकुमार कांबळे, विकास थोरात, जवान आण्णासाहेब कर्चे, नंदकुमार वेळापूरे, आण्णासाहेब फड, पवन उगले आणि शिवानी मुढे यांनी ही कारवाई केली. पुढील तपास दुय्यम निरीक्षक एस. डी. कांबळे करीत आहेत.

भारतरत्न इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेसच्या वतीने अभिवादन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान, भारतरत्न आणि देशाच्या राजकीय इतिहासात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या स्वर्गीय इंदिराजी गांधी यांच्या १०९ व्या जयंतीनिमित्त सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने सोलापूर महानगरपालिका येथील त्यांच्या पूणाकृती पुतळ्यास खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी इंदिराजी गांधी यांच्या देशासाठीच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून त्यांनी देशाचे समर्थ नेतृत्व केले. त्यांनी प्रदीर्घ काळ पंतप्रधानपदाची धुरा सांभाळली. बँकांचे राष्ट्रीयीकरण, हरितक्रांतीला प्रोत्साहन, देशाची एकता व अखंडता मजबूत करण्यासाठी घेतलेले निर्णय आणि



आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिष्ठा उंचावण्याचे कार्य यामुळे त्यांचे नाव भारतीय इतिहासात अजरामर झाले आहे. त्यांच्या धाडसी नेतृत्वामुळे त्यांना 'आयर्न लेडी' म्हणूनही ओळखले जाते. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा आजही काँग्रेस पक्षाला प्रेरणा देत आहे.

यावेळी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, माजी महापौर संजय हेमांडगी, आरिफ शेख, प्रदेश सचिव राहुल वर्धा, कार्याध्यक्ष हणमंतु सायबोळू, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तुपेलवंडे, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष जुबेरभाई कुरेशी, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, मीडिया सेल अध्यक्ष तिरुपती परकीपंडला, भटक्या-विमुक्त विभागाचे अध्यक्ष युवराज जाधव, मागासवर्गीय विभागाचे अध्यक्ष सागर उबाळे, शहर मध्य युवक काँग्रेस अध्यक्ष वाहिद बिजापुरे, प्रवक्ते सेल अध्यक्ष नागनाथ कदम, सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक कन्ना, विचार सेल अध्यक्ष ॲड. करीमुन्निसा बागवान, अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश सरचिटणीस रुस्तुम कंपली, ब्लॉक अध्यक्ष बाबुराव म्हेत्रे, दिनेश म्हेत्रे, परशुराम सतारेवाले, माजी नगरसेवक दत्तू अण्णा बंदपट्टे, हरुण शेख, उपाध्यक्ष अंबादास गुत्तीकोंडा, बसवराज म्हेत्रे, सिद्धाराम चाकोते, राजन कामात, अनिल मस्के, गणेश आप्पा नरोटे, गिरीधर थोरात, लखन गायकवाड, संजय गायकवाड, भीमराव शिंदे, हाजी मलग नदाफ, रफिक चकोले, नूरअहमद नलवार, मोहसीन फुलारी, राजेश झंपले, सुशीलकुमार म्हेत्रे, रवी आंबेवाले, माजी महिला अध्यक्ष हेमाताई चिंचोळकर, शोभा बोबे, शुभांगी लिंगराज, मुमताज तांबोळी, ज्योती गायकवाड, चंद्रकला निजमल्लू, नागेश म्याकल, काळीदास काळपगार, व्यंकटेश बोमेन, शुकुर शेख, जितराज गरड, शिवाजी साळुंखे, आप्पा सलगर, साईल शिंदे, सुनील डोळसे, अभिलाष अच्युगटला, सचिन सुरवसे, इब्राहिम कलबुर्गी आदी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इंदिराजी गांधी यांच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या विचारांचा, त्यागाचा आणि देशसेवेच्या कायार्चा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

बुद्धिबळाच्या पटावर एन बी नवले सिंहगडच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांकाचा बहुमान पटकावला. या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या स्पर्धेत महाविद्यालयाचे विद्यार्थी अभिषेक अड्डागटला, पीयूष साठे, ओंकार देवकर आणि हर्षद गुंड यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत महाविद्यालयाच्या यशात



मोलाचे योगदान दिले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, डॉ. प्रदीप तपकीरे, डॉ. विजय बिरादार, डॉ एस. एस. शिरगण, डॉ के. एस. पाटील, प्रा. हरिष गुरमे तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, जनसंपर्क अधिकारी रामकृष्ण लांबतुरे व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना क्रीडा समन्वयक प्रा. योगेश शेटे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी, कॅम्पस डायरेक्टर, प्राचार्य व शिक्षकवृंदांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

श्रुतिका शिंदे व ऋतिका शिंदे यांना बीएएमएस अभ्यासक्रमाला प्रवेश



तडवळे (कटूसत्य वृत्त):- धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथील वृत्तपत्र विक्रेते भागवत शिंदे यांची कन्या श्रुतिका शिंदे व त्यांचे बंधू लहू शिंदे यांची कन्या ऋतिका शिंदे या दोघींना वैद्यकीय क्षेत्रातील बीएएमएस अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाल्याबद्दल टीचर्स ग्रुप व मित्र परिवाराच्या वतीने गुरुवारी (दि १९) त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. वृत्तपत्र विक्रेते भागवत शिंदे यांची एक मुलगी भारती शिंदे ही एमबीबीएसचे शिक्षण घेत असून दुसरी मुलगी श्रुतिका शिंदे ही एम.यू.पी.एस. आयुर्वेदिक महाविद्यालय रिसोड जिल्हा वाशिम या ठिकाणी बीएएमएस या वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र झाली आहे. त्याचप्रमाणे त्यांचे बंधू लहू शिंदे यांची मुलगी ऋतिका शिंदे ही संगम सेवाभावी ट्रस्ट संगमनेर जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी बीएएमएस साठी पात्र झाली आहे.त्यामुळे गुरुवारी तडवळे येथील टीचर्स ग्रुपच्या वतीने दोन्ही भगिनींचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी उपसरपंच प्रताप करंजकर, तडवळा पॅटर्नचे जनक जगन्नाथ धायगुडे, बाळासाहेब जमाले, अमजद शेख, अनिल क्षीरसागर, दीपक होगले, भागवत शिंदे, लहू शिंदे, दिपाली शिंदे, रूपाली शिंदे, स्वप्नील शिंदे व कुटुंबीय उपस्थित होते.